# सेवाशक्ती टाईम्स

https://www.sewashaktitimes.com | मुख्य संपादक - अंकोश जानु राठोड - 9011509831 | कार्यकारी संपादक - गजानन सरकटे - 8605433822 | E-mail: ankoshrathod25@gmail.com

बुलडाणा ● वर्ष:- 3 रे ● अंक:- १४२ ● पाने:- ४ ● किंमत:- २ रुपये ● RNI:- MAHMAR/2022/87884 ● बुधवार १६ जुलै २०२५

## पवारांनी भाकरी फिरवताच नवा इतिहास घडणार?

## प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे काय म्हणाले?



सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा

### शशिकांत शिंदेंपुढे मोठे आव्हान!

आता लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होणार आहेत. त्यामुळे आगामी काळ शशिंकात शिंदे यांच्यासाठी आव्हानात्मक असणार आहे. यावरही त्यांनी भाष्य केलंय. अगोदरचे राजकारण वेगळे होते. आताच्या राजकारणाची पद्धत वेगळी आहे. अगोदर राजकीय नेते जनतेचे प्रश्न उपस्थित करायचे आणि सत्ताबदल व्हायचा आता मात्र सत्ताबदल अधिकाराच्या मदतीने, यंत्रणेच्या मदतीने, आमिष दाखवून केला जातो. त्यामुळे माझ्यापुढे हे पहिले आव्हान असेल, असे मत शिंदे यांनी व्यक्त केले. तसेच या बदललेल्या राजकारणाबाबत लोकांत जागृती करण्याचा मी प्रयत्न करेन. राज्यभर दौरा करत असताना मी पक्षसंघटना मजबूत करण्याचा प्रयत्न करेन, असेही यावेळी शशिकांत शिंदे यांनी सांगितले. दरम्यान मी पक्षाला सत्तेत आणण्यासाठी दिवसरात्र कष्ट करणार आहे, अशी ग्वाहीही शिंदे यांनी दिली आहे. त्यामुळे आता शरद पवारांनी भाकरी फिरवल्यामुळे भविष्यात पक्ष सत्तेत येऊन नवा इतिहास घडणार का? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

पक्षात या पदासाठी अनेक दिग्गज नेते पात्र आहेत. तरीदेखील मला ही संधी देण्यात आली. या संधीचं सोनं करण्याचा मी प्रयत्न करेन. सामान्य घरातील मुलगा नेता कसा होतो हे आर आर पाटील यांच्या माध्यमातून आपल्याला पाहायला मिळालं. त्याच पद्धतीने मी काम करणार आहे, असंही ते म्हणाले. तसेच मी सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी शासनाच्या आणि सरकारच्या चुकीच्या धोरणाविरोधात मी आवाज उठवणार आहे. वेळ आलीच तर मी रस्त्यावर उतरुन सरकारला जागं करण्याचा प्रयत्न करेन, असं आश्वासन त्यांनी जनतेला तसेच पक्षाला दिले.

**मुंबई :** शशिकांत शिंदे यांची राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष म्हणून अधिकृत पणे निवड करण्यात आली आहे. खासदार शरद पवार यांनीच शिंदे यांच्या नावाची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे प्रदेशाध्यक्ष पदासाठी शरद पवार यांच्या पक्षातून हे एकच नाव समोर आले होते. त्यामुळे शिंदे यांच्यावर एकमताने प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. दरम्यान, आता प्रदेशाध्यक्ष पदी विराजमान झाल्यानंतर शशिकांत शिंदे यांनी प्रथमच प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी मी सामान्य जनतेचे प्रश्न सरकारपुढे मांडण्या साठी लढणार आहे. तसेच पक्षाला सत्तेत बसवण्या साठी रात्रंदिवस मी काम करणार आहे, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्या नंतर शशिकांत शिंदे यांनी पत्रकार परिषद आयोजित केली. यावेळी त्यांनी पत्रकारांच्या वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरं दिली. आज शरद पवार आणि पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी, सर्व पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रदेश शरद पवार गटाचा अध्यक्ष केल्याबद्दल मी सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करतो, अशा भावना यावेळी शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केल्या. तसेच आपल्या सर्वांच्या वतीने मी महाराष्ट्राच्या जनतेला ग्वाही देतो की, ज्या नेत्याने महाराष्ट्राच्या गोरगरीब जनतेसाठी अहोरात्र कष्ट केले त्या नेत्याचा एक कार्यकर्ता म्हणून मी महाराष्ट्रातील अनेक प्रश्नांना, अन्यायाला वाचा फोडण्याचा प्रयत्न मी करेन. या काळात पक्षसंघटना वाढवण्या साठी प्रयत्न करेन. पक्षाला सत्तेत आणण्या साठी मी दिवसरात्र कष्ट करेन, अशी ग्वाहीही त्यांनी जनतेला दिली.महाराष्ट्रात पालिका आणि जिल्हा परिषद अशा स्थानिय स्वराज्य संस्थांच्या निवडणूका होण्यापूर्वी शरद पवार यांच्याराष्ट्रवादी काँग्रेस मध्ये बदल होणार असल्याचे संकेत दिले जात होते. आज अखेर राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदाची जबाब दारी पश्चिम महा राष्ट्रातील नेते शशिकांत शिंदे यांच्या खांद्यावर सोपवली आहे. राष्ट्रवादीच्या दुसऱ्या फळीतील नेते असलेल्या शशिकांत शिंदे यांना पश्चिम महा राष्ट्रासह राज्यभरात पक्षांची वाढ करण्याची जबाबदारी असणार असून त्यांची परीक्षा स्थानिय स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांत होणार आहे. राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर या पदावर शशिकांत शिंदे यांची वर्णी लागणार असल्याचे बोलले जात होते. जयंत पाटील यांनी पक्षाच्या वर्धापन दिनी हे पद सोडणार असल्याचे संकेत दिले होते, ते म्हणाले होते की, शरद पवार साहेबांनी मला खुप संधी दिली. माझ्याकडे पक्षाचे सात वर्षे प्रदेशाध्यक्षपद राहीले. अखेर पार्टीत नव्या चेहऱ्यांना संधी मिळायला हवी. मला पदमुक्त करा ही माझी नम्र विनंती आहे. हा पक्ष शरद पवार साहेब यांचा आहे. त्यांनी यावर निर्णय घ्यायला हवा, आपल्याला खुप पुढे यायचे आहे असे पाटील म्हणाले होते.पक्षात या पदासाठी अनेक दिग्गज नेते पात्र आहेत. तरीदेखील मला ही संधी देण्यात आली. या संधीचं सोनं करण्याचा मी प्रयत्न करेन. सामान्य घरातील मुलगा नेता कसा होतो हे आर आर पाटील यांच्या माध्यमातून आपल्याला पाहायला मिळालं. त्याच पद्धतीने मी काम करणार आहे, असंही ते म्हणाले. तसेच मी सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी शासनाच्या आणि सरकारच्या चुकीच्या धोरणाविरोधात मी आवाज उठवणार आहे. वेळ आलीच तर मी रस्त्यावर उतरून सरकारला जागं करण्याचा प्रयत्न करेन, असं आश्वासन त्यांनी जनतेला तसेच पक्षाला दिले.

## मंत्र्यांचे पत्ते कट; मुख्यमंत्री वापरणार धक्का तंत्र?

## राज्याच्या कॅबिनेटमध्ये मोठे फेरबदल होण्याचे संकेत




गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात घडत असलेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर हा संभाव्य मंत्रिमंडळ विस्तार अत्यंत महत्वाचा मानला जात आहे. महायुती सरकारमध्ये लवकरच मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होणार असून अनेक विद्यमान मंत्र्यांचे पत्ते कट केले जातील, असे बोललं जा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या या 'धक्का तंत्रा'ची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरु आहे. यापूर्वी केवळ भाजपच्याच मंत्र्यांना याचा फटका बसेल अशी शक्यता वर्तवली जात होती. पण आता सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही मंत्र्यांनाही याची झळ बसू शकते, असे बोललं जात आहे. यामुळे महायुतीतील तिन्ही घटक पक्षांमध्ये मोठी उलथापालथ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या मंत्रिमंडळ फेरबदलात अनेक नव्या चेह-यांना कॅबिनेटमध्ये संधी मिळण्याची शक्यता आहे. पक्षसंघटनेत चांगले काम केलेल्या किंवा आपापल्या भागांमध्ये मजबूत पकड असलेल्या नेत्यांना मंत्रिपदे दिली जाऊ शकतात, असे संकेत मिळत आहेत. त्यासोबतच, "काही इतर पक्षातील दिग्गजांना पक्षात घेऊन मग त्यांना मंत्रिमंडळात घेऊन मंत्रिपद दिलं जाईल, असेही बोललं जात आहे. यामुळे विरोधकांमध्येही अस्वस्थता वाढण्याची शक्यता आहे.

सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा

**मुंबई :** राज्याच्या राजकारणातील सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आता धक्का तंत्राचा वापर करण्याची शक्यता आहे. या धक्का तंत्राचा अनेक बड्या मंत्र्यांना फटका बसण्याची शक्यता आहे. लवकरच राज्याच्या कॅबिनेट मध्ये मोठे फेरबदल होण्याचे संकेत मिळत आहेत. या संकेतानुसार अनेक बड्या मंत्र्यांना आपली खुर्ची गमवावी लागणार आहे. तर अनेक नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता सूत्रांकडून वर्तवली जात आहे. हे धक्का तंत्र फक्त भाजपच्या मंत्र्यांपुरतं मर्यादित असेल की एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसाठीही असेल याचीही चर्चा रंगली आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणाकडे अवघ्या देशाचं लक्ष लागलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसां पासून राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडी घडत आहेत. त्या अनुषंगाने आता राज्याच्या कॅबिनेटमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता सूत्रांकडून वर्तवली जात आहे. लवकरच महायुती सरकारमध्ये मंत्रिमंडळात फेरबदल होणार आहेत. काही इतर पक्षातील दिग्गजांना पक्षात घेऊन मग त्यांना मंत्रिमंडळात घेऊन मंत्रिपद दिलं जाईल, असं बोललं जात आहे. अनेक मंत्यांचे पत्ते कट केले जातील. खांदे पालट होईल, अनेक नव्या चेहऱ्यांना कॅबिनेटमध्ये संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच यामुळे अनेक मंत्यांना धक्का बसणार असल्याचे बोललं जात आहे. गेल्या काही दिवसां पासून राज्याच्या राजकारणात घडत असलेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर हा संभाव्य मंत्रि मंडळ विस्तार अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. महायुती सरकारमध्ये लवकरच मंत्रि मंडळात मोठे फेरबदल होणार असून अनेक विद्यमान मंत्र्यांचे पत्ते कट केले जातील, असे बोललं जा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या या 'धक्का तंत्रा'ची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरु आहे. यापूर्वी केवळ भाजपच्याच मंत्र्यांना याचा फटका बसेल अशी शक्यता वर्तवली जात होती. पण आता सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वा खालील राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही मंत्र्यांनाही याची झळ बसू शकते, असे बोललं जात आहे. यामुळे महायुतीतील तिन्ही घटक पक्षांमध्ये मोठी उलथापालथ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## बेडरुमचा दरवाजा वाजवला, आईला संशय आला;

## — दार तोडताच रक्ताच्या थारोळ्यात दिसले पती-पत्नी —

सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा



**नाशिक :** मुलगा आणि त्याची बायको दुपारच्या वेळी बेडरुममध्ये गेले होते. बऱ्याच वेळाने आई उठली आणि तिने बेडरुमचा दरवाजा ठोठावला. आतून काहीच प्रतिसाद आला नाही. त्यामुळे आईला संशय आला. तिने शेजाऱ्यांना बोलावले. शेजाऱ्यांच्या मदतीने दरवाजा तोडण्यात आला. त्यानंतर बेडरुममध्ये येताच पती-पत्नी रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे पाहून सगळेच हादरले. नाशिक मधील सिडको भागात ही घटना घडली. नाशिक मधील सिडको परिसरातील अंबड गावाजवळ असलेल्या फडोळ मळा भागात एका दाम्पत्याने विष प्राशन करत हाताची नस कापून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली. नागरिकांच्या सतर्कते मुळे त्यांचा हा प्रयत्न अयशस्वी झाला. त्यांना अत्यवस्थ स्थितीत खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र दोघांचीही प्रकृती चिंताजनक आहे. सचिन गवळी (४०) आणि माया गवळी (३८) अशी दोघांची नावे आहेत. नेमकं काय घडलं? अंबड फडोळ मळा भागात राहणाऱ्या गवळी दाम्पत्याने सोमवारी (दि.१४) दुपारी घरातील बेडरुमचा दरवाजा बंद करून विष प्राशन केले यानंतर हाताची नस कापून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. यावेळी घरात सचिन यांच्या आई होत्या, तर वृद्ध वडील लहान मुलांना शारक्ताच्या थारोळ्यात पडलेले होते नवरा बायको आईने बेडरुमचा दरवाजा ठोठावला, मात्र प्रतिसाद न मिळाल्याने संशय आला. त्यांनी शेजाऱ्यांच्या मदतीने दरवाजा तोडून बघितले असता दोघेही रक्ताच्या थारोळ्यात कोसळलेले आढळून आले. स्थानिक नागरिकांनी दोघांना तत्काळ रुग्णालयात दाखल केले. या दोघांवर उपचार सुरु असून दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे. गवळी दाम्पत्याने टोकाचे पाऊल का उचलले, यामागील कारण अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही. याप्रकरणी अंबड पोलिस पुढील तपास पोलीस करत आहेत.ळेत घेण्यासाठी गेले होते.

## मरेपर्यंत शेतकऱ्यांच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही - बच्चू कडू



सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा

### नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर तीन तास चक्का जाम!

सातबारा कोरा पदयात्रेत सहभागी होण्यासाठी विविध जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणात शेतकरी अंबोडा येथे दाखल झाले होते. काही शेतकरी ट्रॅक्टर घेऊन पदयात्रेत सहभागी झाले होते. तर काहींच्या हातात लाठ्याकाठ्यांसह रुमणे होते. या शेतक-यांनी राज्य सरकारविरोधात घोषणाबाजी करीत महामार्गावर चक्काजाम आंदोलन केले. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक सुमारे तीन तास ठप्प झाली होती.

### चिलगव्हाण येथे शेतकरी कुटुंबाशी साधला संवाद!

१९ मार्च १९८६ रोजी चिलगव्हाण येथील साहेबराव करपे या शेतक-याने सहकुटुंब आत्महत्या केली होती. राज्यातील पहिली शेतकरी आत्महत्या म्हणून याची नोंद आहे. पदयात्रा निघाल्यानंतर बच्चू कडू यांनी चिलगव्हाण येथे जाऊन शेतकरी कुटुंबीयांशी संवाद साधला. आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सत्यपाल महाराजही आवर्जून अंबोडा येथे आले होते.

**यवतमाळ :** निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले, निवडणुका संपल्यानंतर या आश्वासनाचा सरकारला विसर पडला. खरं तर शासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे राज्यात शेतकरी आत्महत्येचे सत्र सुरू आहे. सरकार या अत्यंत संवेदन शील विषयात आंधळ्याचे सोंग घेत असल्याची खरमरीत टीका 'प्रहार'चे नेते बच्चू कडू यांनी केली. अमरावती जिल्ह्यातील पापळ येथून सुरु झालेल्या सातबारा कोरा पदयात्रेचा समारोप आठव्या दिवशी सोमवारी महागाव तालुक्यातील अंबोडा येथे झाला. याप्रसंगी ते बोलत होते. मंचावर प्रसिद्ध सप्तखंजिरीवादक सत्यपाल महाराज, आमदार रोहित पाटील, माजी आमदार ख्वाजा बेग उपस्थित होते. सभेला मोठा जनसमुदाय उपस्थित होता. येथे उपस्थित राहिल्याने तुमचे ना नाव येणार होते, ना गाव येणार होते, तरीही लोकचळवळ म्हणून विश्वासाने उपस्थित राहिलात, माझ्या बरोबर १३८ किलोमीटर चाललात, या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही. यापुढे मरेपर्यंत शेतकरी आणि शेतकऱ्यांसाठी संघर्ष करीत राहीन, अशी ग्वाही कडू यांनी दिली. शेतकऱ्यांच्या मनामध्ये सरकारविरोधात संताप आहे. कर्जमाफी देऊन शेतकऱ्यांचे दुःख हलके करण्याची संधी असताना सरकार वेळकाढूपणा करीत आहे. कर्जमाफीतून सरकारला सुटी देणार नाही, याच मागणीसाठी येत्या २४ जुलै रोजी संपूर्ण राज्यभर चक्काजाम आंदोलन करण्याची घोषणा बच्चू कडू यांनी केली. याप्रसंगी राष्ट्रवादीचे आमदार रोहित पाटील यांनीही शेतकऱ्यांशी संवाद साधला.सातबारा कोरा पदयात्रेत सहभागी होण्यासाठी विविध जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणात शेतकरी अंबोडा येथे दाखल झाले होते. काही शेतकरी ट्रॅक्टर घेऊन पदयात्रेत सहभागी झाले होते. तर काहींच्या हातात लाठ्याकाठ्यांसह रुमणे होते. या शेतकऱ्यांनी राज्य सरकार विरोधात घोषणाबाजी करीत महा मार्गावर चक्काजाम आंदोलन केले. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक सुमारे तीन




गट ग्रामपंचायत घाटबोरी च्या उपसरपंच पदी श्री विजय सिंग चव्हाण यांची बिनविरोध निवड गट ग्रामपंचायत घाटबोरी च्या उपसरपंच पदी निवड झाल्याबद्दल सरपंच राजकुमार पाखरे, ग्राम पंचायत अधिकारी शरद वानखेडे,व ग्राम पंचायत सदस्य,व ग्रामस्थ यांच्या वतीने विजय सिंग चव्हाण यांचा सत्कार करण्यात आलाया वेळी माजी पंचायत समिती सदस्य विष्णुपंत पाखरे,माजी सरपंच दिलीप पाटील नवले,बंडु शेठ,माजी ख वि स अध्यक्ष रविकुमार चुकेवार , दैनिक सेवाशक्ती टाईम्स चे मुख्य संपादक अंकोश राठोड, सुधीर घोडे सामाजिक कार्यकर्ते, प्रल्हाद आप्पा चुकेवार ग्राम सेवा सोसायटी अध्यक्ष , शेख गफ्फार , रायसिंग चव्हाण,हे उपस्थित होते.

## विशेष बातमी

## वाहतूक पोलीसांना खाजगी मोबाईल वापरण्यास बंदी - आदेश जारी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शेख कदीर भाई.**



**मुंबई :** वाहतूक पोलिसांनी ई-चलानची कारवाई करताना स्वतःच्या खाजगी मोबाईलचा वापर करू नये, अशा स्पष्ट शब्दांत आदेश देण्यात आले आहेत. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) प्रविण साळुंके यांनी संबंधित पोलीस आयुक्त व अधीक्षकांना परिपत्रकाद्वारे निर्देश जारी केले आहेत.दि. २ जुलै रोजी परिवहन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनात झालेल्या बैठकीत वाहतूक संघटनांनी तक्रार केली होती की, काही पोलीस अंमलदार खाजगी मोबाईलमधून वाहनांचे फोटो काढून नंतर सोयीने ई-चलान करत असून, त्यामुळे चुकीचे चलान होतात.याआधी २०२० आणि २०२४ मध्येही अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या होत्या, मात्र अद्यापही काही पोलीस अंमलदार खाजगी मोबाईलचा वापर करत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, असे निर्देश यातून देण्यात आले आहेत.

## भिम टेकडी झाली प्रकाशमय पिंप्री काथरगाव सरपंच सुवर्णाताई टापरे यांच्या पाठपुराव्याला यश

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शेख कदीर भाई.**

**संग्रामपूर :** तालुक्यामधील काथरगाव पिंप्री स्वातंत्र्यानंतर तब्बल अनेक दशकं अंधारात असलेली काथरगाव पिंप्री येथील भिम टेकडी आता अखेर प्रकाशमय झाली आहे. लोकनियुक्त सरपंच सौ. सुवर्णाताई गणेश टापरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा, निवेदने व आंदोलनाच्या इशाऱ्यांमुळे महा वितरण विभागाला जाग आले आणि अखेर भिम टेकडीवर वीज पोहोचली.महावितरण कंपनीकडे वेळोवेळी लेखी निवेदने देऊनही कामाची गती न वाढल्यामुळे, सरपंच सुवर्णाताई टापरे यांच्या नेतृत्वाखाली गावातील महिलांनी महा वितरणच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन केले. यामध्ये ज्योती संदीप शेगोकार, सुजाता सुनील सरदार, शिलाबाई भिमराव हातेकर, उल्फा सिद्धार्थ सुरळ कार, विठ्ठल मुंडे, विजय गोल्हर यांनी सहभाग घेतला होता. आंदोलनाच्या परिणामी भिम टेकडीवर १४ विजेचे पोल टाकण्याचे काम हाती घेण्यात आले.दिनांक १४ जुलै २०२५ रोजी भिम टेकडीवर अखेर वीज आली आणि हा ऐतिहासिक क्षण साजरा करण्यासाठी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे या दिवशी जन्मापासून अंधारात वाढलेला मयूर शेगोकार याचा वाढदिवसही साजरा करण्यात आला. सरपंच



सौ. सुवर्णाताई टापरे यांनी स्वतः मयूरचा वाढदिवस साजरा करत नागरिकांच्या आनंदात सहभागी झाल्या. कार्यक्रमात भिम टेकडी वरील नागरिकांनी सौ. सुवर्णाताई गणेश टापरे यांचा सत्कार केला. तसेच महावितरणचे कर्मचारी विनोद बाजोळ यांचाही सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमास गावातील नागरिक, महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये शिलाबाई हातेकर, उल्फा सुरळकार, ज्योती शेगोकार, सुजाता सरदार, संदीप खराटे, विजय गोल्हर, विठ्ठल खराटे, अनिल खराटे, ज्ञानदेव कंकाळ, देविदास मेंहगे, विजय माळेकार, राष्ट्रपाल श्रीकृष्ण देवकुळे, विष्णू बावस्कार, हातेकर शिवशंकर बावस्कार, मनोज गोल्हर, आदित्य सरदार, रामेश्वर डाखोके, उमेश चव्हाण, अंकुश सुरळकार, शंकर कंकाळ यांचा समावेश होता.हा ऐतिहासिक क्षण म्हणजे लोक शाही मार्गाने विकासासाठी लोकप्रतिनिधींनी घेतलेले भक्कम पाऊल आहे, अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.





आमचे मार्गदर्शक सकाळ वृत्तपत्राचे खामगाव तालुका प्रतिनिधी तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष माननीय श्री सचिन भाऊ बहुरूपी यांचा वाढदिवस खामगांव ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने साजरा करण्यात आला. उपस्थितांमध्ये संतारामजी तायडे, सहदेव वाकोडे,कैलास नांदोकार, नवनीत सोनाळकर, विठ्ठल दांदळे, श्रीकृष्ण चौधरी, संदीप राठोड, कासिम खान, इत्यादी पत्रकार बांधव उपस्थित होते.










दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831
Title code :- MAHMAR52107

# प्रवीण गायकवाड यांच्यावरील हल्ल्याचे जशास तसे उत्तर देऊ - मनोज वाघ

## भ्याड हल्ल्याच्या जाहीर निषेध - मनोज वाघ

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**

**बुलढाणा :** काल अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष प्रवीणदादा गायकवाड यांच्या वरील शाईफेक प्रकरणाची संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष मनोज वाघ यांनी तीव्र शब्दात निंदा केली असून, हाच तुमचा जनसुरक्षा कायदा आहे का असा संतप्त सवाल मुख्यमंत्री फडणवीस यांना केला आहे. संभाजी ब्रिगेड ही संघटना ऐतिहासिक सामाजिक सांस्कृतिक व राजकीय भान ठेवून शिव शाहू फुले आंबेडकर यांच्या विचारावर चालणारी संघटना आहे. प्रवीलदादा गायकवाड हे एक प्रगल्भ नेतृत्व असून समाजमन सुदृढ व निरोगी रहावे ह्यासाठी सातत्याने प्रयत्नरत असतात. त्यांची अभ्यासू व वैचारिक प्रगल्भता त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसून येते. त्यामुळे अख्या महाराष्ट्राने त्यांच्या पाठीशी उभे राहून ह्या घटनेचा निषेध करावा असे आवाहन सुद्धा मनोज वाघ यांनी केले आहे.प्रसिद्धी पत्रक संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मा. प्रविणदादा गायकवाड हे दि.१३ जुलै २०२५ रोजी अक्कलकोट याठिकाणी पुरस्कार वितरण कार्यक्रमासाठी आले असताना त्यांच्यावर पाळत ठेवून भाजप युवा मोर्चा प्रदेश सचिव टवाळखोर गुंड दीपक सीताराम काटे व त्याच्या साथीदारांनी पूर्वनियोजितपणे शाईफेक करून भ्याड हल्ल्याचा प्रयत्न केला,मर्दाला एकट्यात गाठून हल्ला करणे ही नामर्दाची गांडुगिरी आहे. संभाजी ब्रिगेड संघटनेचे नाव बदलून धर्मवीर संभाजी ब्रिगेड करा, अन्यथा घरात घुसून मारू अशी खुलेआम धमकी मागच्या काही महिन्यांपासून या भाजपच्या गूंडाकडून दिली जात होती. भाजपचा पदाधिकारी असल्याने त्याच्यावर सोलापूरकर कोरटकर प्रमाणेच सरकारने कारवाई केली नाही हे उघड आहे. हीच आधुनिक पेशवाई आहे. गेली ४० वर्षे सामाजिक क्षेत्रात तरुणांना दिशा देण्याचे काम करणाऱ्या प्रविण दादा गायकवाड यांच्यावरील भ्याड हल्ल्याची ही घटना शासन, प्रशासन आणि पोलिस खात्याचे धिंडवडे काढणारी आहे.ही सरकारी यंत्रणेची सपशेल हार आहे. फडणवीसांच्या काळात कदाचित हेच अपेक्षित आहे.पेशवाई यापेक्षा वेगळी नसावी.नुकताच राज्य सरकारने राज्यात जनसुरक्षा कायदा मंजूर करून डाव्या विचारांच्या संघटनांवर कारवाईचे संकेत दिले आहेत, त्या पार्श्वभूमीवर उजव्या विचारांच्या संघटनांची ही दादागिरी सरकार पुरस्कृत आहे का,दिपक काटे,भिडे यांना हा कायदा लागू होणार नसेल तर आम्ही त्याची होळी करतो. यांच्यावर कारवाई न करता त्यांना असे हल्ले करण्याची मुभा दिली जाणार आहे का? फडणवीसांना हेच भ्याड हल्ले अपेक्षित आहेत



का? हा सरकार पुरस्कृत दहशतवादी हल्ला आहे का? संभाजी ब्रिगेड संघटना २८ वर्षांपासून कार्यरत आहे. संघटनेच्या नावातून कोणत्याही प्रकारे एकेरी उल्लेख होत नाही. महापुरुषांचे नाव संघटनेला, पक्षाला, शहराला, गावाला दिल्याची अनेक उदाहरणे आहेत. ज्या भ्याड व्यक्तीने हा हल्ला केला त्या व्यक्तीच्या संघटनेचे नाव शिव धर्म फाउंडेशन असे आहे, मग हे नाव एकेरी आहे की आदरार्थी हा प्रश्न त्या भ्याड हल्लेखोराने आधी स्वतःला का विचारला नाही. विरोधी विचारसरणीच्या संघटनेचे नाव काय असावे हे ठरवायचा अधिकार यांना कुणी दिला. यामागे भाजपचे वेगळेच राज कारण शिजत आहे का हा प्रश्न आहे. दीपक काटे हा गुंड भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांचा निकटवर्तीय आहे. काही महिन्यां पूर्वी पुणे विमानतळावर या टवाळखोर मवाल्याला रीव्हॉल्वर आणि जिवंत काडतूसांसह पकडण्यात आले होते. इंदापूर MIDC मध्ये इतर अनेक ठिकाणी खंडणी मागितल्या प्रकरणात त्याच्यावर गुन्हे दाखल आहेत. वेगवगेळ्या गुन्ह्यांमध्ये या टवाळखोर गुंडाचे नाव आहे. अशा गुंडाला राजकीय अभय दिले जाते,हेच भाजपचे अच्छे दिन आहेत का?संभाजी ब्रिगेड आणि सर्व समविचारी संघटना या भ्याड हल्ल्याचा निषेध करून थांबणार नाहीत. आम्ही निवेदने देऊन, निषेध करून आता थांबणार नाही.सोलापूरकर कोरटकर प्रकरणी सरकारची भूमिका हीच यावेळीही असणार आहे त्यामुळे हे सततचे हल्ले थांबवण्यासाठी ही विकृती ठेचावीच लागणार आहे,आणि आम्ही ती ठेचणार आणि हाच आमचा संभाजी ब्रिगेडचा इतिहास आहे.आता आम्ही घरात घुसून मारू.ही वेळ आलेली आहे.ती वेळ सरकारने आमच्यावर आणली आहे.संभाजी ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षांवरील हा हल्ला म्हणजे शिवराय-फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेवरील हल्ला आहे.येथील सामान्य कार्यकर्त्यांच्या अस्मितेवर हल्ला आहे.आम्ही कायद्याला मानतो, याचा अर्थ आम्ही निमूटपणे अन्याय सहन करून घेऊ असा होत नाही.आता बस्स आम्ही आता सहन करणार नाही,भगतसिंग यांच्या भाषेत 'हमारे धमाको की गुंज आवाज बनकर गुंजेगी' आम्ही जशास तसे उत्तर देऊ,भाजपचा पदाधिकारी इतका माज कोणाच्या जीवावर करतो ?संभाजी ब्रिगेड हा माज मोडणार...असे मनोज वाघ यांनी प्रसिध्दी पत्रकाचे शेवटी मनोज वाघ यांनी म्हटले आहे

## "ऑपरेशन प्रहार" अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखे कडून अवैध जुगारावर छापा टाकून 4 लाख 6 हजाराचा मुद्देमाल जप्त करून 13 इसमावर कारवाई

**सेवाशक्ती टाईम्स.**
**जुनेद अली.**

**अकोला :** श्री. अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक, अकोला यांचे निर्देशा प्रमाणे अकोला जिल्हया मध्ये अवैध धंदे समूळ नष्ट करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहीम राबविण्यात येत आहे. दिनांक 14/07/2025 रोजी स्थानिक गुन्हे शाखा अकोला चे पथकाने मिळा लेल्या गुप्त बातमी वरून पो स्टे. जुने शहर हद्दीत जैन चौक अकोला येथे तीन तास पत्याच्या सहायाने हारजितचा जुगार खेळणाऱ्या इस्मानवर जुगार रेड केली असता एकूण 13 आरोपी पकडून त्यांचे कडून नगदी




55,000 रु, वेगवेगळ्या कंपनीचे 11 मोबाईल ज्याची किंमत 1,01,000/- रु, तसेच 5 वेगवेगळ्या कंपनीच्या मोटर सायकल की 2,50,000 असा एकूण 4,06,000 /- रु मुद्दे माल पंचा समक्ष जप्त केला करण्यात आले. यातील आरोपी नामे 1) नितीन अशोक गोहर 2) अनिल गोवर्धनदास चांडक 3) महेंद्रसिंग त्रिपाल सिंग दिवाकर 4) मोहसीन खान सलीम खान 5) मजर खान जाफरखान 6) शेख राहील शेख आजार 7) मोहम्मद आतिक मोहम्मद हबीब 8) सचिन हेमंत सावळे 9) बशीर खान रहू खान 10) शेख रफिक शेख हुसेन 11) भारत हिम्मत जाधव 12) उमेश जुंबन दामले, 13) स्वराज दिलीप सिंग ठाकूर यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन जुने शहर अकोला येथे कलम 4,5 महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहेसदरची कार्यवाही सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री अर्चीत चांडक साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री बी. चंद्रकांत रेड्डी साहेब, पोलीस निरीक्षक श्री शंकर शेळके यांचे मार्गदर्शना खाली सदरची कारवाई A p i गोपाल ढोले, HC उमेश पराये, HC खुशाल नेमाडे, PC आकाश मानकर PC अभिषेक पाठक, मो. आमिर, चालक Gpsi ठाकरे, pc खरात स्थानिक गुन्हे शाखा, अकोला यांनी केली.

## स्मार्ट मीटर बसविण्यावर तीव्र आक्षेप; समाजसेवक आनंद मामा भदर्गे माजी नगरसेवक सय्यद जमील यांची आक्रमक भूमिका

**सेवाशक्ती टाईम्स.**
**रियाज शेख.**

**मानवत :** शहरात महावितरण कडून बसविण्यात येणाऱ्या स्मार्ट मीटरला नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर विरोध होत असून, या निर्णयाविरोधात समाजसेवक आनंद मामा भदर्गे आणि माजी नगरसेवक सय्यद जमील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. शहरातील सामान्य नागरिकांच्या हिताला धक्का पोहोचवणारा हा



निर्णय असून, स्मार्ट मीटर बसवल्या नंतर सर्वसामान्य ग्राहकांची आर्थिक लूट होणार असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. केवळ लोकांच्या मर्जीविरुद्ध स्मार्ट मीटर बसवणे म्हणजे अन्याय कारक आणि जबरदस्तीची कृती असल्याचेही या नेत्यांनी म्हटले. महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना त्यांच्या कार्यालयात भेट देऊन या दोघांनी लेखी निवेदन सादर केले. नागरिक उपस्थित होते.स्मार्ट मीटरचा मुद्दा सध्या संपूर्ण राज्यात वादग्रस्त ठरत असतानाच मानवत शहरातही नागरिकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. नागरिकांच्या भावना लक्षात घेता स्मार्ट मीटर बसवण्याचा निर्णय तात्काळ थांबवावा, अशी मागणी या माध्यमातून करण्यात आली. यापुढेही नागरिकांच्या हिता साठी आवाज बुलंद करत राहू, असा इशारा आनंद मामा भदर्गे आणि सय्यद जमील यांनी दिला.

## जिल्हासेवा वर्तणूक नियम 1966 च्या कलम 3 चा भंग केल्याने प.स.शेगावच्या कनिष्ठ सहाय्यकास केले निलंबित; गटविकास अधिकारी सी एस राजपूत यांचे आदेशाने कार्यवाही

**सेवाशक्ती टाईम्स.**
**देवचंद्र समदूर.**

**शेगाव :** पंचायत समिती शेगाव कार्या लयात अनधिकृत गैरहजर राहून वरिष्ठांच्या आदेशाची अवहेलना करणाऱ्या शेगाव पंचायत समितीच्या कनिष्ठ सहाय्य कास गटविकास अधिकारी सी. एस. राजपुत यांच्या आदेशाने निलंबित करण्यात आले आहे.शेगाव पंचायत समितीचे कनिष्ठ सहाय्यक आशिष दिनकरराव वावगे यांच्यावर वरिष्ठांच्या आदेशाची अवहेलना करणे, कार्यालयात अनधिकृत गैरहजर राहणे असा ठपका ठेवत त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६६ चे कलम ३ चा भंग केलेला आहे. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती शेगाव यांना दिलेल्या अधि काराचा वापर करून शेगाव पंचायत समितीचे कनिष्ठ सहाय्यक आशिष दिनकरराव वावगे यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा ( शिस्त व अपील) नियम १९६४ चे कलम ३ नुसार जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच वावगे यांना मुख्यालय देण्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांच्याकडे अहवाल पाठवण्यात आला आहे. सदर घटनेमुळे पंचायत समिती कार्याल यातील कर्मचाऱ्यांचे व हम करे सो कायदा मनमानी ड्युटी करणाऱ्या इतरही विभागातील कर्मचाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले असल्याचे चित्र दिसत आहे.

## पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था शाबूत ठेवण्यासाठी प्रामाणिकपणे कर्तव्य बजावणे गरजेचे - प्रदीप गावंडे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष

**सेवाशक्ती टाईम्स.**
**कार्यालय प्रतिनिधी**

**बार्शीटाकळी :** प्रहार ऑपरेशन मोहीम यशस्वी होत असल्याने ग्रामीण भागातील सर्व सामान्य नागरिकाला आता समाधान वाटत असले तरी, पिंजर सारख्या ग्रामीण भागाततील पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था शाबूत ठेवण्यासाठी मनापासून प्रामाणिकपणे कर्तव्य पार पाडणे गरजेचे आहे, असे मत महात्मा गांधी तंटामुक्ती समितीचे पिंजर अध्यक्ष प्रदीप दत्तारामजी गावंडे यांनी व्यक्त केले आहे, आज पोलि सांच्या जबाबदाऱ्या वाढल्या आहेत, हे सुद्धा सर्व सामान्य नागरिक मान्य करत आहे, पोलिसांच्या जबाबदाऱ्या पाहता त्यांच्या पगारात राज्य सरकारने निश्चितच वाढ करावी, असेही लोकांचे म्हणणे, परंतु , पिंजर सारख्या आदर्श गावात असा 'इचूकाटा' पोलीस कर्मचारी असल्यामुळे नागरिकाच्या मनात दहशत निर्माण झाली आहे, आपल्या आदर्श वर्दीचा अभिमान ठेवावा, आणि ग्रामीण भागातील सर्व सामान्य लोकांशी चांगले संबंध पोलिसांनी प्रस्थापित करावे, जनतेसोबत चांगले वर्तन ठेवावे, आणि जनतेनेही पोलिसांना सहकार्य करणे, हेही तेवढे गरजेचे आहे, परंतु काही लोकांकडून खाकी वर्दीचा भंग सुद्धा केले जात असल्यामुळे नाराजी व्यक्त केल्या जात आहे, बे शिस्तीत आणि कायद्याचा भंग करणाऱ्या



कर्मचाऱ्यांची गावकरी आणि तंटामुक्ती समिती अजिबात गय करणार नाही, असे महात्मा गांधी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष प्रदीप गावंडे म्हणाले, त्यासाठी पोलिसांनी आणि गावातील सर्व नागरिकांनी एकोप्याचे संबंध ठेवणे गरजेचे आहे, मात्र, सरकारी काम करत असताना नशेत राहून लोकांना धमक्या देण्याचे काम करणाऱ्याची अजिबात गय केल्या जाणार नाही, प्रामाणिक पोलिसांना सहकार्य करावे, आणि असभ्य वर्तन करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याला धडा शिकवावा, अशी मागणी सुद्धा महात्मा गांधी तंटा मुक्ती समितीचे अध्यक्ष प्रदीप दत्तारामजी गावंडे यांनी व्यक्त केले आहे, गाव पातळीवर गावातील प्रमुख कार्यकर्ते अनेक वादाच्या घटना जागेवर मिटविण्याचे काम करतात, त्यामुळे गावात शांतता नांदत आहे, मात्र बेशिस्तित आणि असभ्य वर्तन करणाऱ्या पोलिसांची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अजिबात गय करू नये, त्यांचे विरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, असेही तंटामुक्ती समिती अध्यक्ष प्रदीप गावंडे म्हणाले.

## स्व.नितीन महाविद्यालय येथे करियर संसद शपथविधी सोहळा संपन्न

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अहेमद अन्सारी.**

**पाथरी :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र व स्व.नितीन महाविद्यालय पाथरी यांच्यावतीने दि. 15 जुलै रोजी जागतिक युवा कौशल्य दिना निमित्त स्व.नितीन महाविद्यालय पाथरी येथे करिअर कट्टा च्या माध्यमातून करियर संसद सोहळा संपन्न झाला . यावेळी संसदेमध्ये पुढील पदाधिकारी यांची निवड करण्यात आली १)





मुख्यमंत्री म्हणुन वैष्णवी अशोक वाघमारे, तर २) नियोजन मंत्री - विष्णु साधु पितळे ३) कायदे व शिस्त पालन मंत्री - शिवराज मुंजाभाऊ कुटे ४) सामान्य प्रशासन मंत्री - आदीत्य अशोकराव गिराम, ५) माहिती व प्रसारण मंत्री- अंकुश मुरलीधर पितळे ६) उद्योजकता विकास मंत्री - सौरभ शामराव कांबळे, ७) रोजगार स्वयं रोजगार मंत्री - नंदकिशोर संतोष तिथे, ८) कौशल्य विकास मंत्री - संजना सुदाम चिंचाने, ९) संसदीय कामकाज मंत्री- ऋतुजा रामेश्वर मानो लीकर, १०) महिला व बाल कल्याण मंत्री - श्रद्धा बाला साहेब गरड ११) सदस्य - पूजा हनुमान कौसले ,१२) सदस्य- ओंकार माणिक माने१३) सदस्य - श्रद्धा ज्ञानोबा गिरामया करियर संसद सोह ळ्याच्या कार्य क्रमाचे अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ.राम फुन्ने सर, विशेष उपस्थिती उप प्राचार्य डॉ. एस टी सामाले, करिअर कट्ट्या चे समन्वयक डॉ. मारोती खेडेकर, या कार्य क्रमास डॉ. हरी काळे ,डॉ. रंजीत गायके, डॉ.आर एम जाधव , डॉ. जे एम बोचरे, प्रा. दत्ता भिसे आदी मान्यवरांची ऊपस्थीती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कुमारी वैष्णवी वाघमारे यांनी मानले.

## पिंजर ठाणेदार यांचा वादग्रस्त पोलीस 'कॉन्स्टेबल डोंगरे विरुद्धचा डिफॉल्ट' एस, पी महोदयाच्या दालानात

**सेवाशक्ती टाईम्स.**
**प्रदीप गावंडे.**

**बार्शीटाकळी :** तालुक्यातील पिंजर पोलीस स्टेशनचे वादग्रस्त पोलीस कॉन्स्टेबल कुणाल डोंगरे यांची जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार करण्यात आल्याने पिंजरचे ठाणेदार गंगाधर दराडे यांनी यासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्याकडे डिफॉल्ट सादर करणार असल्याची माहिती ठाणेदार यांनी माध्यमांना दिली आहे दिली आहे, त्यामुळे गावकऱ्यांमध्ये उलट सुलट चर्चा सुरू आहे,पोलीस कर्तव्यावर असताना दारू पिणे आणि लोकांना पैशासाठी धमकावणे, गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देणे, गावातील व परिसरातील सर्वसामान्य नागरिकांशी या पोलीस कर्मचाऱ्यांचे असभ्यवर्तन आहे, असा ठपका नागरिकांनी ठेवला आहे, या पोलीस कर्मचाऱ्यांना पिंजरचे ठाणेदार दराडे यांचे कडून 'पाठबळ' मिळत असल्याचाही आरोप देखील ग्रामस्थांनी तक्रारीतून केला आहे,असे सर्व लोकांचे म्हणणे आहे, पोलिसांकडून नेहमी न्यायाची अपेक्षा केली जात, काही पोलिसांनी आपल्या देशासाठी जीवावर उदारहून कार्य केले आहे, पोलीस यंत्रणा आहे म्हणून हे जग सुरक्षित आहे, हेही आम्ही मान्य करतो, परंतु बार्शीटाकळी तालुक्यातील पिंजर पोलीस स्टेशन मधील कर्मचाऱ्याकडून चांगली वागणूक मिळत नसल्याने सर्व ग्रामस्थांनी 14 जुलै रोजी सन्माननीय जिल्हा पोलीस अधीक्षक अर्जित चांडक यांच्या कार्यालयात रीतसर तक्रार दाखल करण्यात आली आहे, तक्रारीच्या आधारे आणि संतप्त झालेल्या जनतेकडून मिळालेल्या माहिती नुसार वृत्तपत्रातून वृत्त प्रकाशित करण्यात आली होते, 15 जुलै रोजी वादग्रस्त पोलीस कर्मचाऱ्या विरोधात वृत्त प्रकाशित झाल्या नंतर प्रचंड खळबळ वाजली, वृत्तपत्रातील बातम्या पाहून सर्वसामान्य जनतेला आता तरी आपल्याला न्याय मिळेल, या पोलीस कर्मचाऱ्यांची येथून हकालपट्टी होईल,असा विश्वास वाटत आहे, दिनांक 15 जुलै रोजी ठाणेदार दराडे यांच्याशी आमच्या तालुका प्रतिनिधींनी संपर्क साधला असता, त्यांनी आज डोंगरे पोलीस कॉन्स्टेबल बाबत आज डिफॉल्ट जाणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली आहे, सदर डिफॉल्ट मध्ये काय असणार आहे ?याबाबत आमचे तालुका प्रतिनिधी प्रदीप गावंडे यांनी विचारणा केली असता, त्यांनी गावकऱ्यांनी केलेल्या तक्रारी नुसार, आणि त्यांचे दारू पिऊन असभ्य वर्तन असल्याचा उल्लेख सुद्धा या डिफॉल्ट मध्ये असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले, त्यामुळे शिस्तप्रिय आणि ऑपरेशन प्रहार कडे प्रामुख्याने लक्ष केंद्रित करणारे सन्माननीय जिल्हा पोलीस अधीक्षक या डिफॉल्ट मध्ये काय निर्णय देतील, हे नंतर पहावयास मिळणार आहे.

## जिल्हा परिषद शाळा सावंगी माळी येथील सहाय्यक शिक्षक यांच्यावर कारवाई करण्याची मागणी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**समाधान सरकटे.**

**साखरखेर्डा :** साखरखेर्डा येथून जवळच असलेल्या सावंगी माळी येथे मराठी प्राथमिक शाळा असून येथे दोन शिक्षक कार्यरत आहेत परंतु येथील सहाय्यक शिक्षक पी डी मगर हे सतत गैरहजर रहातअसल्याची तक्रार येथील सरपंच दत्ता गवई यांनी गट शिक्षणाधिकारी अधिकारी यांना निवेदन देऊन त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी निवेदनात केली आहे. सावंगी माळी येथील मराठी प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत शिक्षण मिळते.येथे दोन शिक्षक कार्यरत असून सहाय्यक शिक्षक मगर हे सतत गैरहजर राहत




असल्यामुळे येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत. असून संपूर्ण भार हा दुसऱ्या शिक्षकावर येत असल्यामुळे संबंधित शिक्षकावर योग्य ती कारवाई किंवा या गावातून बदली करून देण्यात यावी अशी मागणी वडगाव माळी सावंगी माळी गट ग्रामपंचायत चे सरपंच दत्ता गवई यांनी गट शिक्षणाधिकारी यांना निवेदन देऊन मागणी केली आहे.

# केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नांना यश

# लोणार पाणी पुरवठा योजनेसाठी २७ कोटी ४५ लाख रुपये मंजूर

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अंकोश राठोड.**

मेहकर : केंद्रीय आयुष, आरोग्य, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि माजी माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या अथक प्रयत्नांनी लोणार शहराच्या पाणी पुरवठा योजनेसाठी २७ कोटी ४५ लाख रुपये उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजूर केले आहेत. आजच याबाबतचे शासकीय परिपत्रक जाहीर करण्यात आले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त सहका र्यातून कार्यान कार्या न्वित करण्यात येत असलेल्या अमृत २.० अभियाना अंतर्गत लोणार शहरा साठी २७.४५ कोटी रुपये खर्चाच्या योजनेचा पाठ पुरावा केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शना खाली तत्कालीन आमदार संजय रायमुलकर यांनी केला होता. महाराष्ट्र जीवन प्राधि करण अमरावतीचे मुख्य अभियंता यांनी तांत्रिक मंजुरी देऊन हा प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समितीकडे पाठ विलेला होता. नगर विकास खात्याचे परि पत्रक क्रमांक अमृत २०२५ /प्र. क्र.११३ /न वि ३३ दिनांक १४ जुलै २०२५ नुसार या योजनेस मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. नगर विकास खात्याचे



उपसचिव सचिन सहस्त्रबुद्धे यांच्या सहीने सदर परिपत्रक आज प्रसिद्ध करण्यात आले आहे. केंद्र शासनाचे १३.७२५ कोटी रुपये तर राज्य सरकारचे १२.३५२ कोटी रुपये अनुदान या योजनेला प्राप्त होणार असून स्थानिक स्वराज्य संस्थेचा १.३७३ कोटी इतका हिस्सा राहणार आहे. एक कोटी ६५ लाख २४ हजार रुपये खर्चाचे जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात येणार असून ५.५९ लाख लिटर क्षमतेचा जलकुंभ उभा रण्यात येणार आहे. १३.३२ कोटी रुपये खर्चून अंतर्गत जलवाहिन्या टाकण्यात येणार आहेत. याव्यतिरिक्त इतर अनुषंगिक कामे करण्यात येणार आहेत. १८ महिन्यात हा प्रकल्प पूर्ण करण्याची अट शासनाने घातली आहे. सदर प्रकल्पा साठी प्रकल्प व्यव स्थापक नगरपालिकेने नेमा वयाचा असून प्रकल्पाची कार्यान्वयन संस्था लोणार नगरपालिका असणार आहे. लोणार मधील तीव्र पाणी टंचाईची समस्या लक्षात घेता सदर प्रकला पाला प्रकल्पाला मंजुरी प्रदान करण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे मंत्री प्रतापराव जाधव आणि माजी आमदार संजय रायमुलकर यांनी अथक प्रयत्न केले हे इथे उल्लेखणीय आहे. लोणार विकास आराख ड्यातील उर्वरित कामे जलद गतीने होण्यास रकमेची उपलता करून देण्यासाठी प्रतापराव जाधव व संजय रायमुलकर यांचे शासन पातळीवर प्रयत्न सुरु आहेत.

## घरकुल लाभार्थ्यांचे प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे निर्देश

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शेख कदीर भाई.**

संग्रामपूर : 14 जुलै दिनांक 14 जुलै 2025 रोजी संग्रामपूर पंचायत समितीच्या सभागृहात ग्रामसेवकांची एक महत्वाची सभा आयोजित करण्यात आली. या बैठकीत गटविकास अधिकारी श्री. पायघन यांनी तालु क्यातील सर्व ग्राम सेवकांना घरकुल योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. या बैठकीत घरकुल योजना अंमल बजावणी तील अडथळे, प्रलंबित प्रकरणे




आणि काम काजाचा आढावा घेण्यात आला. तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांना वेळेवर लाभ मिळत नसल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर ही तातडीची बैठक घेण्यात आली.ग्रामसेवकांनी वेळेत प्रस्ताव सादर करून योजना अंमलबजावणीत गती आणावी, असे सांगत गट विकास अधिकारी पायघन यांनी शासकीय योजनांची प्रभावी अंमलब जावणी ही ग्राम विकासा साठी अत्यावश्यक असल्याचे अधोरेखित केले.

> आज झालेल्या ग्रामसभेच्या मासिक सभेमध्ये घरकुलाचे कामकाज जलद गतीने करण्यासाठी सूचना देण्यात आले आहेत त्या अनुषंगाने सर्व लाभार्थ्यांना विनंती आहेत की तालुक्यात जवळपास एक हजार एक से एक प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोन चे घरकुल मंजूर झालेले आहेत तरी सर्वांनी वेळेत काम पूर्ण करायचेत शिवाय कोणी एजंट किंवा दलाल आपल्याला या घरकुलाच्या बाबतीत बेजार करत असतील किंवा पैसे मागत असतील अशा लोकांची तक्रार या कार्यालयात किंवा लाच लुचपत प्रतिबंधक विभाग यांच्याकडेही करू शकता
>
> - संग्रामपूर गट विकास अधिकारी माधव पायघन -

## संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर भ्याड हल्ला तीव्र निषेध; हल्लेखोरांवर मोक्कांतर्गत कारवाईची मागणी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**

जिंतूर : अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष व सामाजिक चळवळीचे प्रखर नेते प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर नुकताच झालेला भ्याड व घृणास्पद हल्ला म्हणजे केवळ एका व्यक्तीवर नव्हे, तर पुरोगामी विचार सरणी, सामाजिक न्याय आणि लोक शाही मूल्यांवर झालेला आघात आहे, असे संतप्त प्रतिपादन संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी आपल्या निवेदनाद्वारे केले आहे. या हल्ल्याच्या निषेधार्थ तहसी लदार मार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना संभाजी ब्रिगेडच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले. मुख्यमंत्री व गृहमंत्री यांच्यादृष्टीनं हा हल्ला गंभीर असून, या प्रकरणात संबंधित संघटनेचे प्रमुख व हल्ल्यात





सहभागी असलेल्या कार्य कर्त्यांवर मोक्का अंतर्गत कठोर गुन्हे दाखल करून तत्काळ अटक करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.निवेदनात पुढे म्हटले आहे की, प्रवीणदादा गायकवाड हे गेल्या अनेक वर्षांपासून मराठा समाजा साठी, सामाजिक समते साठी आणि पुरोगामी विचार सरणीच्या प्रसारासाठी अविरत झटत आहेत. अशा नेतृत्वावर झालेला हल्ला म्हणजे समाजहिता साठी लढणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उभे करणारा प्रकार आहे. सुरक्षेची मागणी आणि इशारा हल्लेखोरांवर कठोर कारवाई न झाल्यास, आणि प्रवीणदादा यांची सुरक्षा न सुनिश्चित केल्यास, संभाजी ब्रिगेड कायदा हातात घेण्यास भाग पडेल असा इशारा देखील निवेदनातून देण्यात आला आहे. अशा परिस्थितीत कायदा व सुव्यवस्थेचा भंग झाल्यास संपूर्ण जबाबदारी शासनाची राहील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. या निवेदनाच्या प्रती मा. मुख्यमंत्री, गृहमंत्री यांच्यासह तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री तथा ग्राहमंत्री यांना देण्यात आल्या असून,शासनाने तात्काळ ठोस पावले उच लावीत, अशी मागणी संपूर्ण राज्य भरातून होत आहे.या निवेदनावर माजी सैनिक बालाजी शिंदे,शरद ठोंबरे, अँड माधव दाभाडे,संतोष शिंदे, सुनील गाडेकर, पिंटू रोकडे, विलास रोकडे, दामू नवले, बापू भांबळे, अभीजीत देशमुख, सोपान धापसे, धनंजय जाधव, लक्ष्मण कवडे,अनिल गाडेकर, पिंटू डोंबे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत..

## पांढऱ्या मूळ किड्याने सोयाबीनचे 1 हेक्टर पीक उध्वस्त झाले फुलसिंग राठोड संकटात आले

**सेवाशक्ती टाईम्स.**
**श्याम राठोड.**

दारव्हा : दारव्हा तालुक्यातील मानकोपरा गावातील फुलसिंग राठोड यांच्या शेतात सोयाबीन पिकावर पांढऱ्या मूळ किडीने हल्ला केल्याने शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. किडीने सोयाबीनचे पीक खाऊन टाकल्याने शेतकऱ्यां मध्ये भीतीचे वातावरण आहे. सविस्तर वृत्त असे की, दारव्हा तालुक्या तील मानकोपरा येथील शेतकरी फुलशिंग रघुनाथ राठोड यांचे मालकीचे शेत मौजा सांगलवाडी तालुका दारव्हा येथील शेत शिवारात आहे. शेताचा गट नंबर १३ व क्षेत्र १.०० हेक्टर आहे. या शेतात सोयाबीनचे पीक दिनांक २६ जून २०२५ रोजी पेरले होते व ते पीक ८० % उगवले सुद्धा होते. परंतु शेतकऱ्याच्या म्हणण्या नुसार 'मूळ किड्याने' शेतातील सोयाबीनचे सर्व पीक खाऊन टाकले. आम्ही गरीब शेतकरी हातावर आणने आणी पानावर



खाणे असे आमचे जगणे चालू आहे. आम्ही आमची शेती लोकांकडून कर्ज घेऊन,घरचे काही दागिने असले तर ते सोनार जवळ गहाण ठेवून त्या पैशाने शेतीची बियाणे व शेतीसाठी लागणारे साहित्य आम्ही विकत आणतो.आणि आम्ही शेती करतो. अशातच जर किड्याने माझ्या शेतातील सोयाबीनचे ७०% पीक खाऊन टाकले. एवढे मोठे नुकसान झाल्यावर आमच्या सारख्या गरीब शेतकऱ्याला आत्म हत्या करण्या शिवाय पर्याय राहील का?, एवढ्या मोठ्या शेत पिकाच्या नुकसानाने शेतकरी कर्जबाजारी झाल्याशिवाय राहणार का? अशाप्रकारचे प्रश्न उपस्थित होते. त्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. तेव्हा या शेताची मोका पाहणी करून त्वरित नुकसान भरपाई देण्यात यावी.अशा मागणीचे निवेदन शेतकरी फुलसिंग रघुनाथ राठोड यांनी तालुका कृषी अधिकारी व तहसिलदार दारव्हा यांना शुक्रवार दिनांक ११ जुलै २०२५ रोजी दिले.

> शेतपिकला आधीच भाव मिळत नसल्याने शेतकरी कर्जबाजारी झाला आहे.आम्हाला कर्ज काढून शेती करावी लागते. त्यामध्येही अशाप्रकारच्या किड्यामुळे शेतीचे नुकसान झाल्यास आम्ही काय जगावे की, मरावे.माझ्या शेताची मोका पाहणी करून लवकरात लवकर शासनाकडून मदत न मिळाल्यास मला आत्महत्तेशिवय पर्याय नाही.
>
> - फुलसिंग रघुनाथ राठोड, शेतकरी -

> तालुक्यामध्ये ज्या ज्या शेतकऱ्याचे किडीमुळे नुकसान झाले. त्या शेतकयाच्या प्लॉटवर जावून, कृषी विज्ञान केंद्रांचे शास्त्रज्ञ यांना पाचारण करण्यात आले आहे दि. 15/7/2025 रोजी प्रत्यक्षात शेतात जावून पिकपाहणी करण्यात येणार आहे. त्यानुसार किडीच्या प्रदुर्भावामुळे झालेले नुकसान व त्यावरील उपाययोजने संदर्भात मार्गदर्शक करणार आहे. राहला प्रश्न मदतीचा तर त्या शेतकयाच्या झालेल्या नुकसानीचा पंचनामा करुन आम्ही वरीष्ठाना कळवू मदत देण्यासंदर्भात शासनाच्या निकसाप्रमाणे मदत मिळेल.
>
> - गणेश गिरी, तालुका कृषी अधिकारी, दारव्हा -

## शहीद जवान सतीश पेहरे यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**ज्ञानेश्वर गंगावणे.**

खासगाव : जाफराबाद तालुक्यातील वरुड बु. येथील शहीद जवान सतीश पेहरे यांच्या स्मारकावर ५ व्या स्मृती दिनिमित्त आदरांजली वाहण्यासाठी दि.१४ रोजी सकाळी ११ वाजता वीर माता, वीर पिता,वीर पत्नी व त्यांचे कुटुंबीया समवेत तहसील कार्या लयाच्या वतीने शिवाजी लहाने, व पोलीस प्रशासनाच्या वतीने पोलीस निरीक्षक सतीश जाधव व माजी सैनिक संघटना जिल्हाध्यक्ष तथा शिवसेनेचे तालुकाप्रमुख



कुंडलिक पा. मुठ्ठे यांनी स्मारकावर पुष्प वाहून आद रांजली वाहत, "अमर रहे,अमर रहे, "शहीद जवान, अमर रहे, भारत माता की जय, वंदे मातरम् अशा विविध घोषणा देण्यात आल्या. यानंतर जाफराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांनी शहीद झालेले सैनिक सतीश पेहरे यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाला उपस्थितां मध्ये जाफराबाद पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सतीश जाधव, पोलिस उपनिरीक्षक राजधर पठाडे, सहाय्यक पोलीस उप निरक्षक श्री मोरे, हे. कॉ. महेश वैद्य पो. कॉ. राम मोरे, तहसील कार्यालय चे तलाठी शिवाजी काळे,वीर पिता सुरेश पेहरे, वीर माता अलकाबाई पेहरे, वीर पत्नी जया पेहरे, वीर पिता भीमराव नागरे माजी सैनिक शंकर ताठे, रमेश खरात विठ्ठल साळवे, त्र्यंबक साळवे अरुण साळवे काकडे दुर्योधन साळवे यांच्यासह गावातील महिला व ग्रामस्थ उपस्थित होते. तर शेवटी माजी सैनिक संघटनेचे जिल्हाअध्यक्ष कुंडलिक मुठ्ठे यांनी आलेल्या मान्यवरांचे आभार मानून, राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# धर्मजागरण यात्रेचे मेहकरात जल्लोषात स्वागत

# स्वामी समर्थ केंद्रात रायमुलकर परिवाराच्या वतीने मोठे स्वागत

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अंकोश राठोड.**

मेहकर : सनातन धर्मजागरण यात्रा मेहकर शहरात पोचल्यावर जल्लो षात स्वागत करण्यात आले. स्वामी समर्थ केंद्रात यात्रेचे आगमन झाल्या वर मान्यवरांच्या उद्घो धनाचा कार्यक्रम झाला. सनातन हिंदू धर्माला शेकडो वर्षांची परंपरा असून अनेक आक्रमणानंतर हे हिंदू धर्म आपले अस्तित्व बळकट करून आहे असे विचार युवाचार्य विवेकदास महाराज (काशी) यांनी व्यक्त केले. युवा सेनेचे नेते नीरज रायमुलकर यांनी धर्म जागरण यात्रेतील सहभागी भाविकांचे स्वागत केले. आपल्या प्रास्ताविक भाषणातून त्यांनी सांगितले की ,प्रत्येकाला आपल्या धर्माचा स्वाभाविक अभिमान असतोच. हिंदू धर्माला आदर्श अशी परंपरा लाभलेली असून सदसद विवेका वर आधारित या परंपरेचा आपल्या सर्वांनाच अभिमान आहे. नृसिंह संस्थांनचे अॅड.रंगनाथ महाराज



पितळे यांच्या वतीने गोपाल महाराज पितळे यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर युवाचार्य विवेकदास महाराज, सद्गुरु पितळे महाराज, स्वामी ब्रजदासजी व गजानन महाराज सपकाळ यांनी भाविकांना मार्गदर्शन केले व धर्म जागरण यात्रेचा हेतू सांगितला. यावेळी नीरज रायमुलकर, शाल्मली रायमुलकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन पत्रकार निलेश नाहटा यांनी केले. या राज्यस्तरीय यात्रेला परळी वैजनाथ येथून प्रारंभ झाला. यात्रेमध्ये एकूण साडेतीनशे भाविक सहभागी झाले आहेत. उद्बोधनाच्या कार्य क्रमा नंतर नीरज संजय रायमुलकर परिवाराच्या वतीने सर्वांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यानंतर गावातून पदयात्रा काढण्यात आली. शेकडो भाविक सहभागी झाले होते. यात्रा चिखलीकडे मार्गस्थ झाली. यावेळी ठाणेदार भालचंद्र आलेवार यांच्या नेतृत्वात पोलिसांनी चोख बंदो बस्त ठेवला. याप्रसंगी वैभव सावजी, रजत मेहकरकर, सारंग माळेकर, श्रीरंग सावजी, धुडकेकर, सचिन खराबे आदी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्य क्रमाचे संपूर्ण नियोजन नीरज रायमुलकर मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले होते. निलेश नाहटा यांनी यात्रेला सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.